सभा क्र १/२०११-१२ | जिल्हा उद्योग केंद्र कोल्हापूर | दिनांक :- २९.०७.२०११

## जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचा कार्यवृत्तांत

वेळ :- ११.३० वा.

सभेच्या प्रारंभी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर यांनी मा. जिल्हाधिकारी यांचे व उपस्थितांचे स्वागत केले व सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

| अ क्र | सूचिवरील विषय | प्रश्न उपस्थित केलेली संस्था | संबंधित खाते | सभेतील विषयावर झालेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | दि १०.३.११ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे | जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर | जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर | दिनांक १०/३/२०११ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत सर्वसंम्मतीने कायम करणेत आला. |
| २ | हातकणंगले ते रुई फाटा पासून वसाहतीकडे येणा-या रोडवर लाईटची व्यवस्था करणे बाबत | श्री. लक्ष्मी इंड. मॅन्यु. असोसिएशन, लक्ष्मी इंड. इस्टेट, हातकणंगले | १. अधीक्षक अभियंता, मराविं कंपनी, कोल्हापूर कार्यकारी २. अभियंता, मराविं कंपनी, जयसिंगपूर | लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट हातकणंगले ते रुई फाटापासून वसाहतीकडे येणा-या रोडवर लाईटची व्यवस्था करणे बाबत एमएसईबीकडे मागणी केल्या प्रमाणे स्ट्रीट लाईटचे अंदाजपत्रक, सादर करणेत आले आहे परंतु पुढील कार्यवाही झाली नसल्याचे असोसिएशनच्या प्रतिनिधींनी सभेत सांगितले. मा जिल्हाधिकारी यांनी संबंधितांना त्वरीत कार्यवाही करुन तसा अहवाल मला व सदस्य सचिव यांना सादर करावा अशा सूचना दिल्या. |
| ३ | लक्ष्मी औद्यो. वसाहतीमधील चोरीस/ लुटमारीस आळा घालणे बाबत | श्री. लक्ष्मी इंड. मॅन्यु. असोसिएशन, लक्ष्मी इंड. इस्टेट, हातकणंगले | मा. पोलीस अधीक्षक, कोल्हापूर | संबंधित असोसएशनचे पदाधिकारी यांनी हातकणगले पोलीस निरिक्षक यांची भेट घेवून माहिती घेतली असता, लक्ष्मी औद्यो वसाहतीमध्ये पोलीस चौकी होणे बाबत यापूर्वीच ऑगष्ट -२०१० मध्ये सदरील औद्योगिक वसाहतीत पोलीस चौकी होणेसाठी जिल्हा पोलीस अधीक्षक यांचेकडे पोलीस निरिक्षक, हातकणंगले यांनी प्रस्ताव सादर केलेची माहिती सभेत दिली. या बाबत जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेकडून सद्यस्थितीचा अहवाल घेवून पुढील सभेस सादर करावा अशा सूचना दिल्या. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | हातकणंगले ओढयापासून वसाहतीमधून माणगांववाडीस जाणारा पाणंद रोड होणे बाबत. | लक्ष्मी इंड. मॅन्यु असोसिएशन | कार्यकारी अभियंता (बांधकाम), जि. प कोल्हापूर | या बाबत सभेमध्ये चर्चा झाली असता मा मुख्यकार्यकारी अधिकारी, जि प यांनी सांगितले की, सदर जागेची पाहणी कार्यालयीकडील इंजिनिअर येऊन करतील तद्नंतर त्या बाबत योग्यती कार्यवाही करता येईल असे सांगितले . या मा जिल्हाधिकारी यांनी सविस्तर प्रस्ताव मा मुख्यकार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करावा व पुढील सभेस याबाबत अहवाल द्यावा अशा सूचना दिल्या. |
| ५ | इचलकरंजी ते लक्ष्मी औद्योगिक वसाहत बस सेवा सुरु करणे बाबत. | लक्ष्मी इंड. मॅन्यु असोसिएशन | व्यवस्थापक म. रा. प. महामंडळ | सदर मार्गावर १५ ऑगष्ट पर्यंत कोणत्याही परिस्थितीत या मार्गावर बस सेवा सुरु करुन बस सुरु झाल्याचा अहवाल मला व सदस्य सचिव यांना विनाविलंब सादर करावा व पुढील सभेपूर्वी हा विषय निकाली काढण्यात यावा अशा सूचना विभागीय नियंत्रक एस टी यांना दिल्या. |
| ६ | वेस्ट मटेरियलसाठी जागा उपलब्ध करणे बाबत | शिरोली मॅन्यु. असो. शिरोली एमआयडीसी | कार्यासन ३, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर | मौजे टोप ता हातकणंगले येथील सरकारी गायरान गट नं. ५५७ मधील ३ हे ९१ आर क्षेत्रामधील ३५० चौ मी जागा फौंड्री वेस्ट (वाळू) टाकणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचेकडील दि. ३१/५/२०११ अन्वये आदेश दिले आहेत. असे प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी यांनी सभेत सांगितले. एमआयडीसी यांनी याबाबत पाठपुरावा करावा अशा सूचना मा जिल्हाधिकारी यांनी दिल्या. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | पंचतारांकित औद्यो वसाहतीमध्ये पोलीस स्टेशनची सुविधा सुरु करणे बाबत. | पंचतारांकित औद्यो वसाहत | १. प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी<br>२. पोलीस अधीक्षक कोल्हापूर | पंचतारांकित औद्यो .वसाहतीमध्ये २००० चौ .मी . जागा आरक्षित करण्यात आली आहे. परंतु अप्पर पोलीस अधिक्षक, कोल्हापूर यांनी ५ एकराचा भूखंड आरक्षित ठेवणेबाबत विनंती केली आहे. सदरहू प्रस्ताव मुख्यालयास उचित आदेशा करीता लवकरात लवकर पाठविणेत येत आहे. अशी माहिती प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी यांनी सभेस सांगितले आहे. |
| ८ | पार्किंग झोन सुविधा मिळणे बाबत | पंचतारांकित औद्यो वसाहत | १. प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी<br>२. कार्यकारी अभियंता एमआयडी सी | ट्रक टर्मिनस करीता भूखंड आरक्षित ठेवण्या आलेला आहे . त्याकरीता मे श्री विमलेश्वर ॲटोमोबाईल ट्रेड रिअल प्रॅक्टीकल ट्रेनिंग संस्था, कोल्हापूर यांनी भूखंड मागणी अर्ज केलेला आहे. सदर अर्ज मुख्यालयास दि २४.२.११ रोजी उचित निर्णयास्तव सादर केला असल्याचे एमआयडीसीकडील अधिका-यांनी सभेत सांगितले . याबाबत मा जिल्हाधिकारी यांचे स्वाक्षरीने मुख्यकार्यकारी अधिकारी, एमआयडीसी यांना पत्र देणे बाबत मा अध्यक्षांनी प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी यांना सूचित केले. |
| ९ | गट नं.१२२ नांदणी ता शिरोळ जि कोल्हापूर मधील जमीन ६ हेक्टर भाडे पट्टा भरणे बाबत | नांदणी औद्यो वसाहत नांदणी | जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर | रु.१९७३४०/- रुपये भरणेस संस्था तयार आहे. तरी १ वर्षाचे भाडे भरणेकरीता परवानगी मिळावी याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाला आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | गोकुळ शिरगांव ते कागल हातकणंगले पंचतारांकित औद्यो. वसाहत बस सेवा सुरु करणे बाबत | गोकुळ शिरगांव मॅन्यु असोसिएशन | विभागीय नियंत्रक एस टी | या बाबत मा जिल्हाधिकारी यांनी संबंधित असोसिएशन यांना सविस्तर प्रस्ताव एस टी कडे सादर करावा अशा सूचना दिल्या. असोसिएशन प्रस्तावावर योग्यती कार्यवाहीकरुन पुढील सभेपूर्वी अहवाल सादर करावा अशा सूचना विभागीय नियंत्रक एस टी यांना दिल्या. |
| | **आयत्यावेळचा विषय** | | | |
| १ | पंचतारांकित औद्यो. वसाहतीमध्ये कांमगारांची संख्या वाढत चाललेली असल्याने के एम टी बस वाढवणे बाबत | पंचतारांकित असो. ऑफ कागल-हातकणंगले | कोल्हापूर महानगरपालिका | पंचतारांकित औद्यो. वसाहतीमध्ये कामगारांची व उद्योजकांची संख्या वाढत चाललेली आहे परंतु के एम टी बस मात्र सकाळी दोन व सायंकाळी दोन सुरु आहेत. कामगारांची संख्या वाढत चाललेने आणखी एक बस वाढविण्यात यावी तसेच सकाळी व सांयकाळी येणा-या बसेस वेळेवर याव्यात. अशी मागणी असोसिएशनने केली आहे. याबाबत संबंधितांच्या कडून अहवाल मागवून योग्यती कार्यवाही करावी अशा सूचना मा जिल्हाधिकारी यांनी दिल्या. |
| २ | महापालिकेकडून हुतात्मा पार्क समोरील जागा मिळणे बाबत | कोल्हापूर इंजि असोसिएशन | कोल्हापूर महानगरपालिका | फौंड्री क्लस्टर योजने अंतर्गत कोल्हापूर इंजि. असोसिएशनने पोल्युशन टेस्टिंग लॅब, कॅड-कॅम ट्रेनिंग सेंटर व औद्यो. क्षेत्रातील विविध ट्रेडचे ट्रेनिंग देणेसाठी हुतात्मापार्क समोरील मे. बुधले आणि बुधले यांच्या लगतची महापालिकेची रिकामी जागा मिळावी अशी मागणी असोसिएशनने केली आहे. याबाबत संबंधितांच्या कडून अहवाल मागवून योग्यती कार्यवाही करावी अशा सूचना मा जिल्हाधिकारी यांनी दिल्या. |

--५--

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | महापालिकेकडून हुतात्मा पार्क समोरील जागा मिळणे बाबत | कोल्हापूर इंजि असोसिएशन | कोल्हापूर महानगरपालिका | फौंड्री क्लस्टर योजने अंतर्गत कोल्हापूर इंजि .असोसिएशनने पोल्युशन टेस्टिंग लॅब, कॅड-कॅम ट्रेनिंग सेंटर व औद्यो.क्षेत्रातील विविध ट्रेडचे ट्रेनिंग देणेसाठी हुतात्मापार्क समोरील मे .बुधले आणि बुधले यांच्या लगतची महापालिकेची रिकामी जागा मिळावी अशी मागणी असोसिएशनने केली आहे. याबाबत संबंधितांच्या कडून अहवाल मागवून योग्यती कार्यवाही करावी अशा सूचना मा जिल्हाधिकारी यांनी दिल्या. |
| ४ | पाणी पुरवठा कचरा उठाव वेळेत होणे बाबत | कोल्हापूर इंजि असोसिएशन | कोल्हापूर महानगरपालिका | शहरातील शिवाजी उद्यमनगर, वाय पी पोवार नगर, पांजरपोळ या तिन्ही औद्योगिक वसाहतीमध्ये पाणीर पुरवठा कचरा उठाव वेळेवर होत नाही. तरी या विषयी योग्य कार्यवाही अशी मागणी असोसिएशने केली आहे याबाबत संबंधितांच्या कडून अहवाल मागवून योग्यती कार्यवाही करावी अशा सूचना मा जिल्हाधिकारी यांनी दिल्या |
| ५ | लघु उद्योगांना स्टॅप डयुटी माफीचे पत्र वेळेत मिळणे बाबत | लक्ष्मी इंड. मॅन्यु .असोसिएशन | मुद्रांक जिल्हाधिकारी, कोल्हापूर | लघु उद्योगांना स्टॅप डयुटी माफीचे पत्र जिल्हा उद्योग केंद्राकडून लवकर मिळते परंतु मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात सादर केल्यानंतर पुढील कार्यवाही होण्यास १ ते २ महिन्याचा कालावधी लागतो. मुद्रांक शुल्क माफी मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाकडून ८ दिवसात मिळावी अशी असोसिएशनने मागणी केली आहे. याबाबत संबंधितांच्या कडून अहवाल मागवून योग्यती कार्यवाही करावी अशा सूचना मा जिल्हाधिकारी यांनी दिल्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | श्री लक्ष्मी औद्यो. वसाहतीकडे येणा-या रोडवर असणा-या विद्युत वाहीन्यांची उंची वाढविणे बाबत | लक्ष्मी इंड. मॅन्यु .असोसिएशन | मुख्य अभियंता म रा वि वि कंपनी मर्या., ताराबाई पार्क,कोल्हापूर | सदर प्रश्नाकरीता आम्ही असोसिएशनच्या वतीने गेल्या ७ वर्षापासून पत्र व्यवहार करीत आहोत .अद्याप सर्व्हिस केबल्स व कंडक्टर यांची उंची वाढविण्याचे काम प्रलंबित आहे. वसाहतीकडे उद्योगाच्या निमित्ताने ये-जा करणारे फुल्ल लोड ट्रक, कंटेनर रात्री अपरात्री ये-जा करत असतांना त्या वाहीन्या तुटन्याचा धोका आहे तसेच जिवीत व वित्त हानी होण्याची शक्यता आहे. तरी सदर सर्व्हिस केबल्स व कंडक्टर यांची उंची वाढवणेचे काम त्वरीत पूर्ण करावे अशी मागणी असोसिएशनने केली आहे मा जिल्हाधिकारी यांनी मुख्य अभियंता, मराविवि कंपनी यांचे कडून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मागवावा अशा सूचना दिल्या. |

सर्व उपस्थितांचे आभार मानले नंतर सभा समाप्त झाली

सही/-

महाव्यवस्थापक, जि उ के तथा
सदस्य सचिव, जिउमि समिती सभा, कोल्हापूर

सही/-

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिउमि समिती सभा, कोल्हापूर

सभा क्र १/२०११-१२ **जिल्हा उद्योग केंद्र कोल्हापूर** दिनांक :- २९/०७/२०११

**जिल्हा सल्लागार समिती सभेची कार्यसूची** वेळ :- ११.५०

सभेच्या प्रारंभी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर यांनी मा. जिल्हाधिकारी यांचे व उपस्थितांचे स्वागत केले व सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

| अ क्र | सूचिवरील विषय | प्रश्न उपस्थित केलेली संस्था | संबंधित खाते | सभेतील विषयावर झालेली कार्यवाही. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | दि .१०.०३.२०११ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे | जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर | जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर | दि १०.०३.२०११ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत सर्व संम्मतीने कायम करणेत आला. |
| | **जिल्हा उद्योग केंद्र राबवित असलेल्या प्लॅन स्किमचा २५/०७/२०११ अखेर अखेरचा प्रगती आढावा -** | | | |
| १ | सुशिक्षित बेरोजगार बीजभांडवल योजना | जिल्हा उद्योग केंद्र | महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र कोल्हापूर | **सुशिक्षित बेरोजगार बीजभांडवल योजनेअंतर्गत**<br>**१. सर्वसाधारण :-**सर्वसाधारण योजने अंतर्गत मागिल वर्षी मंजूर झालेली परंतु वाटपासाठी निधि अभावी या कार्यालयाकडे प्रलंबित असलेली एकूण ०८कर्ज प्रकरणे आहेत. त्याची रक्कम रु २९.३३ लक्ष इतकी असून, उर्वरित रक्कम रु.१२०.६७ ची तरतूद माहे जानेवारी-१२ पर्यंत खर्च होईल.<br>**२. विशेष घटक योजना** विशेष घटक योजने अंतर्गत मागिल वर्षी मंजूर असलेली परंतु निधी अभावी प्रलंबित असलेली २ प्रकरणे प्रलंबित असून, त्याची रक्कम ४.७९ इतकी आहे. उर्वरित रक्कम रु ०.२१ माहे ऑक्टोंबर-११ अखेर खर्च होईल. |
| २ | जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना | जिल्हा उद्योग केंद्र | महाव्यवस्थापक जिल्हाउद्योग केंद्र कोल्हापूर | **जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना**<br>**सर्वसाधारण** :- सर्वसाधारण योजने अंतर्गत मा जिल्हाधिकारी नियोजन शाखा यांचेकडून तरतूद प्राप्त नाही. आठमाही अंदाजपत्रकामध्ये रक्कम रु.२.०० लक्ष मिळणेसाठी प्रस्ताव नियोजन शाखेकडे सादर करीत आहे.<br>**विशेष घटक** :- विशेष घटक योजने अंतर्गत रक्कम रु.१.०० लक्ष इतकी तरतूद प्राप्त असून, सदरची रक्कम माहे सप्टेंबर-११ अखेर खर्च करीत आहोत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम | जिल्हा उद्योग केंद्र | महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र,कोल्हापूर | **<u>सर्वसाधारण व विशेष घटक</u> :-**<br>सर्वसाधारण योजने अंतर्गत या जिल्हयास रक्कम रु १५०.०० लक्ष व विशेष घटक योजनेसाठी रक्कम रु.२५.०० लक्ष इतकी तरतूद या जिल्हयात प्राप्त झाली आहे. या जिल्हयात सध्या एकूण चार संस्था कार्यरत आहेत. त्यांना समान हिस्या मध्ये प्रत्येकी रक्कम रु.४३.७५ वाटप करणेत आली आहे.माहे डिसेंबर-२०११ पर्यंत सर्व तरतूद खर्च होईल. |
| ४ | उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत कुशल प्रशिक्षक संस्थांना मान्यते बाबत प्रस्ताव मुख्यालयास सादर करणे | जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर | जिल्हा सल्लागार समिती | जिल्हयामध्ये उद्योजकता विकास प्रशिक्षण योजने अंतर्गत प्रशिक्षण देण्यासाठी सध्या ४ संस्था कार्यरत आहेत. १) महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, २) मिटकॉन ३) टाईम इन्सिटयूट, ३) महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी,<br>कुशल प्रशिक्षक संस्थां म्हणून मान्यता मिळणेकामी जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर या कार्यालयास एकूण १२ नविन संस्थांचे प्रस्ताव प्राप्त झालेची माहिती महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव यांनी सभेस सांगितले .मा जिल्हाधिकारी यांनी सभेत सूचित केले की, जिल्हयामध्ये दर्जेदार कुशल प्रशिक्षक संस्थांना मान्यता मिळावी या करीता जिल्हास्तरावर एक कमिटी स्थापन करावी त्यामध्ये महाव्यवस्थापक जिउकें, प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी, जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी, आय टी आयचे प्राचार्य, सहा.संचालक, रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय, तसेच जिल्हा अग्रणी बँक अधिकारी इत्यांदीची कमिटी स्थापन करावी.<br>सदर कमिटिने संस्थेच्या मागिल तीन वर्षात देण्यात आलेल्या प्रशिक्षणाची माहिती, मागिल तीन वर्षाचे ताळेबंद पत्र, ट्रेडनिहाय यंत्र सामुग्री तसेच संस्थेने प्रशिक्षणासाठी निवडलेली जागा पुरेशी आहे किवा कसे इत्यादी व इतर आवश्यक सर्व बाबींची काटेकोरपणे पाहणी करुन परिपूर्ण संस्थांचे प्रस्ताव जिल्हा सल्लागार समितीपुढे सादर करावेत अशा सूचना मा जिल्हाधिकारी यांनी दिल्या. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | जिल्हा पुरस्कार | जिल्हा उद्योग केंद्र | जिल्हा उद्योग केंद्र | सन २०१० या वर्षात ५ अर्ज प्राप्त झाले होते. सदर अर्जाची छाननी व उपसमिती मार्फत उद्योग घटकांना भेटी देण्यात आल्या असून, अंतिम पुरस्कार प्राप्त उद्योग घटकाची नांवे पुढील प्रमाणे आहेत.<br>**<u>प्रथम पुरस्कार</u>** :-<br>१. मेरशा शेपर्स प्रा. लि.,<br>अे-८४, पंचतारांकित औद्यो वसाहत,<br>कागल, जि कोल्हापूर<br>**<u>द्वितीय पुरस्कार विभागून</u>** :-<br>१. मोहक लस्सी सेंटर अँन्ड डेअरी,<br>२००६/सी, सोमवार पेठ, कोल्हापूर<br>२. यश बेकर्स ॲन्ड स्विटस्<br>गट नं. १५६३, प्लॉट नं. ५, कणेरी, ता करवीर<br>जि कोल्हापूर<br><br>वरील प्रथम व द्वितीय पुरस्कार उद्योग घटकांच्या निवडीस जिल्हा सल्लागार समितीने मान्यता दिली. |

सर्व उपस्थितांचे आभार मानले नंतर सभा समाप्त झाली

सही/-

महाव्यवस्थापक, जि उ के तथा
सदस्य सचिव, जिसस समिती सभा, कोल्हापूर

सही/-

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिसस समिती सभा, कोल्हापूर

सभा क्र १/२०११-१२ **जिल्हा उद्योग केंद्र कोल्हापूर** **दिनांक :- २९/०७/२०११**

**जिल्हास्तरीय स्थानिक लोकांना रोजगार समिती सभेचा कार्यवृत्तांत** **वेळ :-. १२.१०**

सभेच्या प्रारंभी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर यांनी मा. जिल्हाधिकारी यांचे व उपस्थितांचे स्वागत केले व सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

| **अ.क्र** | **सूचिवरील विषय** | **प्रश्न उपस्थिती केलेली संस्था** | **संबंधित खाते** | सभेतील विषयावर झालेली कार्यवाही. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | दि ०१.२.२०११ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे | जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर | जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर | दि.१०/३/२०११ रोजी झालेलया सभेचा कार्यवृत्तांत सर्व संम्मतीने कायम करणेत आला |
| | १) पर्यवेक्षीय श्रेणीत किमान ५० टक्के व पर्यवेक्षकीयसहीत इतर श्रेणीत किमान ८० टक्के स्थानिक लोकांना नोक-यांमध्ये घेण्याबाबतच्या स्थितीचा औद्योगिक घटक निहाय प्रपत्र स्थालोरो-१ व स्थालोरा-२ आधारे आढावा घेणे<br>२) एखादा उद्योग घटकामध्ये स्थानिक लोकांना आवश्यक त्या प्रमाणात रोजगार देण्यामध्ये कांही अडचणी असल्यास त्याबाबत चर्चा करुन व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विषयक संस्थांमध्ये प्रशिक्षणच्या सोयी उपलब्ध करण्यासाठी आवश्यकती कार्यवाही करणे किंवा इतर उपाययोजना सुचविणे | **जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर** | **सर्व औद्यो. सघटना** | जिल्हा उद्योग केंद्र कार्यालया मार्फत पंचतारांकित औद्यो .वसाहत कागल, अकिवाटे सह.औद्यो वसाहत, जयसिंगपूर, गोकुळ शिरगांव मॅन्यु.असो.गोकुळ शिरगांव, शिरोली मॅन्यु.असोसिएशन शिरोली, इचलकरंजी सह .औद्यो .वसाहत, इचलकरंजी, एमआयडीसी गडहिंग्लज व एमआयडीसी आजरा इत्यांदिना शासन निर्णयाची माहिती देण्यात आली आहे<br><br>तसेच सदर वसाहती मधील उद्योग घटकांचे स्थालोरो प्रमाण पत्र प्राप्त करणे बाबत विनंती केलेली आहे. मोठया उद्योगांना ऑनलाईन माहिती भरणे बाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. अशी माहिती महाव्यवस्थापक यांनी सभेत दिली. |

सर्व उपस्थितांचे आभार मानले नंतर सभा समाप्त झाली

सही/-

महाव्यवस्थापक, जि उ के तथा
सदस्य सचिव, स्थालोरो समिती सभा, कोल्हापूर

सही/-

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
स्थालोरो समिती सभा, कोल्हापूर

**सभा क्र.** १/२०११-२०१२ **जिल्हा उद्योग केंद्र कोल्हापूर** **दिनांक** :- २९/०७/२०११

**जिल्हास्तरीय आजारी उद्योग समिती सभेचा कार्यवृत्तांत** **वेळ** :- १२.३०

सभेच्या प्रारंभी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर यांनी मा. जिल्हाधिकारी यांचे व उपस्थितांचे स्वागत केले व सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

| अ क | सूचिवरील विषय | प्रश्न उपस्थिती केलेली संस्था | संबंधित खाते | सभेतील विषयावर झालेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | दि १०.३.२०११ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे | जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर | .मागिल सभेचा कार्यवृत्तांत सर्व संम्मतीने कायम करणे | दि १०.३.११ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत सर्व संम्मतीने कायम करणेत आला |
| २ | आजारी उद्योगांची सद्यस्थिती बाबत माहिती. | जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केद्र, कोल्हापूर | औद्योगिक संघटनांनी त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये आजारी उद्योग आढळल्यास तसे या कार्यालयास कळवावे शासनाच्या नियमाप्रमाणे असणा-या आजारी उद्योगाच्या सोयी सवलती संबंधित आजारी उद्योग घटकास देण्याची योग्यती कार्यवाही केली जाईल, अशी माहिती महाव्यवस्थापक यांनी सभेत दिली. तसेच मा जिल्हाधिकारी यांनी सूचित केले की संबंधित बॅकांनी देखील घटक जर थकित रक्कमे खाली गेला असेल तर त्याची योग्य कारणे शोधून रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे आजारी उद्योग असल्याचे जिल्हा उद्योग केंद्राला कळवावे. तसेच जिल्हा अग्रणी बँक यांनी तालुका स्तरावरील सभेत सर्व बँकर्सना या विषयी मार्गदर्शन करावे. |

सर्व उपस्थितांचे आभार मानले नंतर सभा समाप्त झाली

सही/-

महाव्यवस्थापक, जि उ के तथा
सदस्य सचिव, आजारी उद्योग समिती सभा, कोल्हापूर

सही/-

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
आजारी उद्योग समिती सभा, कोल्हापूर